प्रत्येक रुग्णाला वेळेवर उपचार हिच प्रशासनाची कटिबद्धता >>पान 2
नॉर्थ कॅनरा गौड स्वारस्वत को - ऑप बँकेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी एसीबी मार्फत चौकशी : गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम >>पान 3
क्यु आर कोड सहित संगणकीकृत विवाह नोंदणीसाठी युजर आय डी ची ग्रामीण रुग्णालयाकडून मागणी >>पान 4


सुविचार
जीवनात संतुलन राखा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 303 ■ मंगळवार, दि. 15 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


पंचायतच्या सचिवजी आणि रिंकीचं खऱ्या आयुष्यातही सूत जुळलं?
आतील पान

# छत्रपती शिवाजी महाराजांची दुर्गसंपदा महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले महाराष्ट्राचे अभिनंदन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, स्वर्णदुर्ग, विजयदुर्ग, खान्देरी हे ११ किल्ले आणि तमिळनाडूतील जिंजी असे एकूण १२ किल्ले जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली ही दुर्ग संपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा आणि सांस्कृतिक वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे, ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन करताना काढले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भौगोलिक परिस्थितीचा उत्तम वापर करून किल्ले बांधणी, गनिमी काव्याला अनुकूल भूरचनेचा उत्तम वापर, वैशिष्ट्यपूर्ण दरवाजे, लष्करी रणनिती, गनिमी कावा याला पूरक ठरणारी डोंगरी किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. पूर्वीच्या राजांनी किल्ले महसूल विषयक नियंत्रणासाठी बांधले. मात्र शिवाजी महाराजांनी याचा वापर लोक कल्याणार्थ निर्माण झालेल्या स्वराज्य बांधणीसाठी केला. हा विचार युनेस्कोने अद्वितीय वैश्विक मूल्य म्हणून मान्य केला आहे.

वारसा यादीत किल्ल्यांचा समावेश झाल्याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार आहे. त्यांच्याकडे देशातल्या वेगवेगळ्या भागातून ७ प्रस्ताव युनोस्कोमध्ये नामांकन होण्याकरिता गेले होते. त्यापैकी पंतप्रधानांनी निर्णय घेऊन छत्रपती शिवरायांचे किल्ले हेच जागतिक वारसा म्हणून नामांकन करायचे ठरविले. या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आभार मानले.

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या पुरातत्त्व वास्तूसंग्रालयाचे, संचालनालयाचे संचालक यांनी हा प्रस्ताव तयार केला. संपूर्ण भारतातून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणास ८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामध्ये महाराष्ट्राच्या २ प्रस्तावांचा समावेश होता. त्यातील भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश या प्रस्तावाची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावतीने निवड करण्यात आली. या नामांकनाच्या कार्यवाहीचा भाग म्हणून प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करण्यासाठी द. कोरिया येथील श्री. कोगली यांनी महाराष्ट्र, तमिळनाडू राज्यातील किल्ल्यांना भेट दिली. यासंबंधी नवी दिल्ली येथे जुलै २०२४ मध्ये झालेल्या यूनेस्कोच्या जागतिक वारसा समितीचे ४६ व्या अधिवेशनातील चर्चासत्रात महाराष्ट्रातील तज्ञांनी भाग घेतला. युनेस्को मुख्यालय, पॅरिस येथे या प्रस्तावाचे तांत्रिक सादरीकरण करण्यात आले. सर्व सदस्य देशांमध्ये मतदानाद्वारे यावर सदस्य देशांची मते आजमावण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर बैठका घेण्यात आल्या. विदेश मंत्रालय, युनेस्को, भारताचे राजदूत आणि अनेक देशांच्या राजदूतांशी थेट संपर्क साधून नामांकन झालेल्या किल्ल्याचे महत्त्वही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विषद केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,




११ जुलै २०२५ रोजी युनेस्कोच्या सांस्कृतिक समितीच्या आंतराराष्ट्रीय बैठकीत एकमताने भारताने ही विजयश्री खेचून आणली आहे. जवळपास सगळ्या कमिटीपैकी, मतदानाचा अधिकार २० देशांना होता. या २० ही देशांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे हे किल्ले जागतिक वारसा स्थळ आहे, असे मतदान केले. त्यामुळे एकमताने, याठिकाणी हा प्रस्ताव मंजूर झाला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या अद्वितीय किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी हातभार लावावा, असेही त्यांनी सांगितले. ऐतिहासिक क्षणाबद्दल सभागृहामार्फत महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तूसंग्रहलय व संचलनालय आणि या कार्यातील योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांचे, महाराष्ट्रातील जनतेचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

# शिवसेना पक्ष, धनुष्यबाण कुणाचा?

**मुंबई/प्रतिनिधी : शिवसेना पक्ष आणि चिन्हावरुन ठाकरे गट आणि शिंदे गटात सुरु असलेला वाद आता निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. सर्वोच्च न्यायालयात या खटल्याच्या सोमवारी झालेल्या सुनावणीवेळी खंडपीठाने महत्त्वाच्या सूचना दिल्या. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी आजच्या सुनावणीत एक महत्त्वाची टिप्पणी केली. त्यांनी ठाकरे गटाला सांगितले की, आता या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत. तुम्ही त्यामुळे आता नव्याने अर्ज करणे बंद करा. हे प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. आता याप्रकरणाची मुख्य सुनावणी ऑगस्ट महिन्यात घेऊ, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.**

यावेळी शिंदे गटाकडून मुकूल रोहतगी आणि नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. तर ठाकरे गटाकडून रोहित शर्मा आणि कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी याप्रकरणाची मुख्य सुनावणी सुरु करण्याचे सांगितल्यानंतर कपिल सिब्बल यांनी ऑगस्ट महिन्यातील तारखेची मागणी केली. तेव्हा न्यायमूर्तींनी माझे वेळापत्रक तपासून तुम्हाला सुनावणीची तारीख कळवतो, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्टमध्ये शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतच्या खटल्याची मुख्य सुनावणी पूर्ण करेपर्यंत महानगरपालिका निवडणूक येऊ शकते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय हा निर्णय राखून ठेवू शकते. परंतु, निवडणूक संपल्यानंतर म्हणजे २०२५ हे वर्ष संपण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाकडून शिवसेना पक्षासंदर्भात अंतिम निकाल सुनावला जाऊ शकतो, असे संकेत मिळत आहेत. ही ठाकरे गटासाठी दिलासादायक बाब मानली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत या प्रकरणाला दोन वर्षे झाली असून आता या खटल्याचा सोक्षमोक्ष लावायचा, असे संकेत दिले. त्यामुळे आता शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांच्याकडेच राहणार का परत उद्धव ठाकरे यांना परत मिळणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर ही सुनावणी ऑगस्टमध्ये होऊन निकाल यावा, हा उद्धव ठाकरेंचा प्रयत्न असेल. शिंदे गटाच्याच्या वतीने म्हणणं होतं की, हे दोन वर्ष झोपा काढत होते, त्यांनी काहीच केलं नाही. सुप्रीम कोर्ट म्हणालं, तरी जे काय सगळं असेल दोन वर्ष झालेले आहेत आणि आता आम्हाला याचा सोक्षमोक्ष करावा लागेल कधी ना कधी. ऑगस्टची डेट आम्ही तुम्हाला दोन ते तीन दिवसात देऊ आणि अशी तारीख देऊन ज्या तारखेला हे मॅटर ऐकलं जाईल. आता मॅटर ऐकलं गेल्यावर एक ते दोन दिवस याच्यावर युक्तिवाद होतील त्याच्यानंतर निकाल राखून ठेवला जाईल, अशी शक्यता आहे.

# राज्यातील रस्ता सुरक्षेबाबत व्यापक आराखडा तयार करण्यात येणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील रस्ता सुरक्षेबाबत व्यापक आराखडा तयार करण्यात येणार असून, रस्ता सुरक्षा निधीतून विविध सुधारणा करण्यात येणार आहेत. महामार्गांवर अपघातानंतर तातडीने मदत मिळावी यासाठी एअर ॲम्बुलन्स सेवा सुरू करण्यात येणार असून, अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज वाहनं तैनात केली जाणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मंत्रालयात विविध विषयातील आयोजित बैठकीत ते बोलत होते.



यावेळी परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अवैध ॲप आधारित वाहतूक व्यवस्थेवर कारवाईचा आढावा सिटी फ्लो व इतर ॲप आधारित अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस संदर्भात दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला. यावेळी मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, नियमबाह्य टॅक्सी, बस वाहतूकीवर कारवाई करण्यात यावी. नियमाने प्रवासी वाहतूक करण्यास कसल्याही प्रकारचे बंधन नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. रस्ते सुरक्षेसंबंधी अचूक आणि सविस्तर माहिती मिळावी यासाठी स्वतंत्र एजन्सीची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही एजन्सी अपघात प्रवण क्षेत्रांची तपशीलवार माहिती देणार असून, त्यावर आधारित उपाययोजना राबवण्यात येणार आहेत असे त्यांनी सांगितले.

# पुढील अधिवेशनात धर्मांतर विरोधी कायदा आणणार - गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात धर्मांतर विरोधात कायद्याच्या अभ्यासासाठी मुख्यमंत्र्यांनी पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालातील सूचनांचा विचार करून पुढील अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा मान्यतेसाठी सादर केला जाईल, असे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य श्रीमती उमा खापरे यांनी पुणे जिल्ह्याच्या दौंड तालुक्यातील केडगाव येथे पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेच्या अनाथ आश्रमात मुली व महिला यांचे धर्मांतरण केले जात असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, डॉ.श्रीमती मनिषा कायंदे, सदाशिव खोत यांनी सहभाग घेतला.

याबाबत माहिती देताना राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, केडगाव येथील अनाथ आश्रमामध्ये मुलींचे धर्मांतरण तसेच मुलींना मारहाण करणे, सार्वजनिक शौचालय साफ करायला लावणे, जातीवरून शिवीगाळ करणे, वाईट वागणूक देणे अशा फिर्यादीवरून ८ डिसेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या संस्थेतील अनियमितता तसेच सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यासंदर्भात तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या महिला पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास सुरू असून एका महिन्यात याचा चौकशी अहवाल प्राप्त होईल, आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी पहिल्यांदाच महिला अधिकाऱ्याची नियुक्ती

नवी दिल्ली: रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी पहिल्यांदाच महिला अधिकाऱ्याची नियुक्ती झाली आहे. वरिष्ठ आयपीएस अधिकारी सोनाली मिश्रा यांची रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने या निर्णयाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सोनाली मिश्रा ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यत म्हणजेच सेवानिवृत्त होईपर्यत रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी कार्यरत राहणार आहेत. रेल्वेची संपत्ती आणि रेल्वे प्रवाशांचे संरक्षण यासाठी रेल्वे सुरक्षा दल कार्यरत आहे. या दलाचे नेतृत्व वरिष्ठ आयपीएस अधिकारी सोनाली मिश्रा करणार आहेत. केंद्र सरकारने १९५७ मध्ये एक अधिसूचना जारी करुन रेल्वे सुरक्षा दलाची स्थापना केली. या दलाला १९६६ मध्ये रेल्वेच्या आणि प्रवाशांच्या संपत्तीची नासधूस तसेच चोरी करणाऱ्यांना अटक करण्याचे तसेच त्यांची चौकशी करण्याचे आणि त्यांच्या विरोधात कोर्टात खटले चालवण्याचे अधिकार मिळाले.

## अमरनाथ यात्रेदरम्यान अपघात! कुलगाममध्ये एका ताफ्याच्या तीन बसची टक्कर, अनेकजण जखमी

**जम्मू काश्मीर :** जम्मू आणि काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील खुदवानी भागात श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्गावर अमरनाथ यात्रेच्या ताफ्याच्या तीन बस एकमेकांवर आदळल्या. या अपघातात १० हून अधिक यात्रेकरू जखमी झाले आहेत.

बालटालकडे जाणाऱ्या यात्रेच्या ताफ्याच्या तीन बस एकमेकांवर आदळल्याची घटना ताचलू क्रॉसिंगनजीक झाली आहे. अपघातात जखमी झालेल्या सर्व यात्रेकरूंना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आले. कैमोह रुग्णालयातील डॉक्टरांनी माहिती दिली की, सुमारे नऊ यात्रेकरूंना प्राथमिक उपचार दिल्यानंतर अनंतनागमधील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात दाखल होण्यास सांगितले आहे.

# पुण्याच्या कुसगाव येथे ५७ टन गोवंशीय मांस सापडल्याप्रकरणी एसआयटी स्थापन करणार : गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.भोयर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्याच्या मौजे कुसगाव येथे २५ मार्च २०२५ रोजी सुमारे ५७००० किलो गोवंशीय मांस दोन मोठ्या कंटेनरमध्ये वाहतूक करताना आढळून आले. इतक्या मोठ्या प्रमाणात गोवंशीय मांस सापडल्याने या संपूर्ण प्रकरणाची विशेष चौकशी पथकामार्फत तपास करण्यात येईल, अशी माहिती गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य श्रीकांत भारतीय, ॲड.अनिल परब यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली. त्यावर गृहराज्यमंत्री डॉ.भोयर यांनी उत्तर दिले.

राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले की, प्राथमिक तपासात एशियन फूड्स मायक्रो प्रा. लि. या कंपनीचा या वाहतुकीत सहभाग असल्याचे उघड झाले आहे. ही कंपनी हैदराबाद येथील असल्याने राज्य शासनाकडून या कंपनीचे अपेडाद्वारे प्राप्त परवाना रद्द करण्यासाठी केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आली असल्याचे गृह राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी सांगितले.

या प्रकरणी कंपनीचे दोन मालक आरोपी आहेत. यातील एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयीन जामीन मिळाला आहे. दुसऱ्या आरोपीच्या अटकेसाठी प्रक्रिया सुरू आहे. वारंवार अशा प्रकारच्या गोमांस तस्करी करणाऱ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) लावण्याचा विचार करण्यात येत आहे. तिसऱ्यांदा गुन्हा करताना आढळल्यास मकोका अनिवार्यपणे लावण्यात येईल. तसेच आगामी अधिवेशनात गोमांस तस्करी विरोधी स्वतंत्र कायदा आणण्याचाही



निर्णय घेण्यात येईल. यासोबतच, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या गोरक्षकांवर खोटे गुन्हे दाखल झाले असतील, तर त्याचा आढावा घेऊन गुन्हे मागे घेण्याच्या दृष्टीनेही विचार केला जाईल, असे गृह राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी स्पष्ट केले.

सन २०२२ ते २०२५ दरम्यान गोवंशीय प्राण्यांची कत्तल, वाहतूक व विक्री संदर्भात २८४९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ४,६७७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच १,७२४ टन मांस जप्त करण्यात आले असल्याची माहितीही राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी यावेळी दिली.

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला. शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्र्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# प्रत्येक रुग्णाला वेळेवर उपचार हिच प्रशासनाची कटिबद्धता

## आरोग्य योजनांचा आढावा; डॉक्टरांनी सजगतेने जबाबदारी पार पाडावी : अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील

दैनिक आपला विदर्भ



**वाशीम/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील नागरिकांना वेळेवर आणि प्रभावी आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी शासनाच्या विविध आरोग्य योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. डॉक्टरांनी रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी सजग राहावे, कोणतीही ढिलाई न करता तत्परतेने उपचार द्यावेत. असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी केले. जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक परिणामकारक बनवण्यासाठी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा संयुक्त आढावा बैठक अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात १४ जुलै रोजी संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.यावेळी पाटील म्हणाले की,शासकीय व खाजगी रुग्णालयातील सर्व डॉक्टरांनी रुग्णांचा जीव वाचविणे, वेळेवर उपचार देणे, हे आपले प्रथम कर्तव्य समजून कार्य करावे. कोणत्याही कारणाने उपचारास विलंब होणार नाही, याची खबरदारी घेतली जावी.यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी , जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी स्वप्नील चव्हाण, भारतीय वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ.संतोष सारडा, जिल्हा समन्वयक डॉ.रणजित सरनाईक, जिल्हा प्रमुख वैभव टकले व अंगीकृत रुग्णालयांचे वैद्यकीय समन्वयक यांची प्रमुख उपस्थिती होती.केंद्र शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना जिल्ह्यात १ एप्रिल २०२० तसेच २८ जुलै २०२३ पासून सर्व शिधापत्रिका धारक कुटुंबाचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेत जिल्ह्यात ११ लाख ५३ हजार ९५७ लाभार्थ्यांचा आतापर्यंत पात्र झाले आहेत आहे.या योजनेमध्ये १ हजार ३५६ गंभीर आजारांवर ५ लाख रुपयापर्यंतच्या शस्त्रक्रिया व उपचार अंगीकृत शासकीय आणि खासगी रुग्णालयातून पूर्णतः मोफत केले जातात.हे आरोग्य विमा कवच प्रति कुटुंब,प्रति वर्ष ५ लाख रुपये अशा स्वरूपात मिळत असते. जिल्ह्यात ९ शासकीय व खाजगी २० रुग्णालये अंगीकृत आहेत. जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, वाशीम,उपजिल्हा कारंजा, ग्रामीण रुग्णालय मानोरा, ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर, ग्रामीण रुग्णालय मालेगाव, ग्रामीण रुग्णालय अनसिंग, ग्रामीण रुग्णालय कामरगाव, ग्रामीण रुग्णालय रिसोड, जिल्हा स्त्री रुग्णालय वाशीम बालाजी बाल रुग्णालय,वाशिम, बिबेकर हॉस्पिटल,वाशिम. हॉस्पिटल,कानडे बाल रुग्णालय, वाशीम. लाईफ लाईन हॉस्पिटल, प्रताप हॉस्पिटल वाशीम , जिजाऊ ऑर्थोकेअर वाशिम, वाशीम.बाहेती हॉस्पिटल वाशीम,वोरा हॉस्पिटल,वाशीम,वाशीम क्रिटिकल केअर सेन्टर,वाशीम,गजानन बाल रुग्णालय हॉस्पिटल,वाशिम.श्री. गजानन बाल रुग्णालय,मालेगांव, खंडेश्वर हॉस्पिटल धानोरा, गाभणे हॉस्पिटल वाशीम गजानन हॉस्पिटल रिसोड, विजय हृदयालय वाशीम , साई हॉस्पिटल वाशीम देशमुख बाल रुग्णालय वाशीम, डाळ हॉस्पिटल वाशीम , काकडे हॉस्पिटल वाशिम रुग्णालयाचा समावेश आहे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या रुग्णालयांचे पाटील यांनी यावेळी अभिनंदन केले. आजपर्यंत या योजनेमधून १४ हजार १४५ लाभार्थ्यांना उपचार आणि शस्त्रक्रियाचा लाभ मिळाला असून यावर ६४ कोटी ५९ लाख ९६ हजार ७७० रुपये खर्च शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे.या बैठकीत योजनांची अंमलबजावणी, लाभार्थ्यांची सद्यस्थिती, रूग्णालयांची कार्यक्षमता व सेवा गुणवत्ता यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.या वेळी योजनांची माहिती व प्रगतीचे सादरीकरण जिल्हा समन्वयक डॉ. रणजित सरनाईक यांनी प्रभावीपणे केले.तसेच बैठकीत आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य अंतर्गत रास्त भाव दुकानदार, सेतू सुविधा केंद्र आणि आशा सेविका यांचेमार्फत पात्र लाभार्थीना आयुष्मान कार्डचे वितरण केले जात आहे. याबाबत चर्चा करण्यात आली. आतापर्यंत ५ लाख १६ हजार ७७७ लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड चे वितरण करण्यात आलेले आहे. आयुष्मान भारत योजनेचे आयुष्यमान कार्ड सर्वांना जुलै २०२५ अखेर शंभर टक्के वितरण करावे, असे निर्देश देण्यात आले. प्रलंबित विषयांवर विभागनिहाय सविस्तर चर्चा झाली. याबाबत प्रलंबित प्रकरणांचे तातडीने निराकरण करून लाभार्थ्यांना योग्य तो लाभ मिळवून द्यावा, अशा सूचना अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिल्या.आरोग्य सेवा ही सामान्य जनतेच्या जीवनाशी निगडीत बाब आहे. यामध्ये कोणतीही दिरंगाई न करता जबाबदारीने कार्य करणे आवश्यक आहे, असे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

# पती-पत्नीने गुप्तपणे रेकॉर्ड केलेला कॉल आता पुरावा म्हणून ग्राह्य

## घटस्फोट प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

नवी दिल्ली : पत्नीच्या माहितीशिवाय रेकॉर्ड केलेले कॉल वैवाहिक वादात पुरावा म्हणून वापरले जाऊ शकतात, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचा निर्णय फेटाळून लावला, ज्यामध्ये म्हटले होते की असे केल्याने पत्नीच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन होते आणि ते पुरावा म्हणून मानले जाऊ शकत नाही. न्यायालयाने म्हटले की, विवाहित जीवनात गोपनीयतेचा अधिकार पूर्ण केला जाऊ शकत नाही. भारतीय पुराव्याच्या कलम १२२ अंतर्गत, पती-पत्नीमधील संभाषण न्यायालयात उघड करता येत नाही, परंतु घटस्फोटासारख्या प्रकरणांमध्ये ते अपवाद मानले जाते.

न्यायमूर्ती बी.व्ही. नागरथना आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले की, 'या प्रकरणात गोपनीयतेच्या अधिकाराचे कोणतेही उल्लंघन झाले आहे असे आम्हाला वाटत नाही. कलम १२२ केवळ पती-पत्नीमधील संवादाच्या गोपनीयतेला मान्यता देते, परंतु ते गोपनीयतेच्या संवैधानिक अधिकाराशी संबंधित नाही (कलम २१).'

केस काय होती?

हा खटला भटिंडा येथील कौटुंबिक न्यायालयात सुरू झाला, जिथे पतीने त्याच्या पत्नीशी झालेल्या संभाषणाच्या रेकॉर्डिंगच्या आधारे घटस्फोटासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने कॉल रेकॉर्डिंगला पुरावा म्हणून स्वीकारले. पत्नीने या निर्णयाला पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने याला गोपनीयतेचे उल्लंघन म्हटले आणि म्हटले की हे रेकॉर्डिंग पुरावा म्हणून मानले जाऊ शकत नाही. उच्च न्यायालयाने आंध्र प्रदेश उच्च न्यायालय आणि इतर निर्णयांचा हवाला देत म्हटले होते की पती-पत्नीच्या खाजगी संभाषणाचे गुप्तपणे रेकॉर्डिंग करणे कायदेशीररित्या चुकीचे आहे.

पतीचा युक्तिवाद, पती-पत्नीच्या प्रकरणात नेहमीच साक्षीदार नसतो

पतीच्या वकिलाने म्हटले की गोपनीयतेचा अधिकार मर्यादित आहे आणि तो इतर घटनात्मक अधिकारांशी समतोल राखला पाहिजे. वैवाहिक वादात अनेक वेळा असे प्रकरण असतात जे फक्त पती-पत्नीतच होतात आणि साक्षीदार नसतो. अशा परिस्थितीत तंत्रज्ञानाच्या मदतीने पुरावे गोळा करणे आवश्यक होते.

पत्नीला पतीची मालमत्ता मानण्याचा विचार असंवैधानिक

१८ एप्रिल रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने एका महिलेच्या पतीने दाखल केलेल्या व्यभिचार प्रकरणात आरोपीला निर्दोष मुक्त केले. न्यायालयाने म्हटले आहे की, पत्नीला पतीची मालमत्ता मानण्याचा विचार आता असंवैधानिक आहे. ही मानसिकता महाभारत काळापासून सुरू आहे. न्यायमूर्ती नीना बंसल कृष्णा यांनी त्यांच्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयाचा उल्लेख केला, ज्यामध्ये आयपीसीच्या कलम १९७ ला असंवैधानिक घोषित करण्यात आले होते. हा कायदा पितृसत्ताक विचारसरणीवर आधारित होता, ज्यामध्ये पत्नीला गुन्हेगार मानले जात नव्हते, तर फसवणुकीची स्त्री मानली जात होती. उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, महाभारतात द्रौपदीला तिचा पती युधिष्ठिराने जुगारात उतरवले होते. द्रौपदीला आवाज नव्हता, तिच्या प्रतिष्ठेचा आदर केला जात नव्हता. ही विचारसरणी अजूनही समाजात अस्तित्वात आहे, परंतु सर्वोच्च न्यायालयाने ती असंवैधानिक घोषित केली आहे.

# पंचायतच्या सचिवजी आणि रिंकीचं खऱ्या आयुष्यातही सूत जुळलं?

**मुंबई/प्रतिनिधी :** पंचायत या सीरिजने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळीच जागा बनवली आहे. त्यातली प्रत्येक भूमिका आपल्या आजूबाजूच्याच व्यक्तींसारखी वाटते. कलाकारांनी ती इतकी ओरिजिनल साकारली आहे की प्रेक्षकही या कलाकारांवर मनापासून प्रेम करतात. अशातच, आता एक नवीनच गॉसिप सुरू झालंय, ते म्हणजे, पंचायतचे सचिवजी आणि रिंकी खऱ्या आयुष्याचत एकमेकांना डेट करतायत! व्हायरल झालेल्या व्हिडिओंमुळे या चर्चांना उधाण आलंय.

सचिवजी आणि रिंकीची ऑफ-स्क्रीन केमिस्ट्री

पंचायतमध्ये अभिनेता जितेंद्र कुमार अभिषेक त्रिपाठी म्हणजेच आपल्या लाडक्या सचिवजीच्या भूमिकेत आहे. तो फुलेरा गावात ग्रामसेवक म्हणून काम करतोय. तर याच गावाच्या सरपंच असलेल्या मंजू देवींची मुलगी आहे रिंकी. रिंकीची भूमिका अभिनेत्री पूजा सिंग उर्फ सानविकाने साकारली आहे. जितेंद्र आणि सानविका यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही व्हिडिओंमुळे ते दोघे खऱ्या आयुष्यातही रिलेशनशिपमध्ये असल्याचं म्हटलं जातंय.

एका मुलाखतीत सानविकाला विचारण्यात आलं की, फुलेरा गावात शूट करताना, तुम्ही सहकलाकारांसोबत खूप वेळ घालवता. फुलेरा गावातली अशी कोणती गोष्ट आहे, जी तुम्हाला शहरातही आपल्या सोबत यायला हवी असं वाटतं? यावर सानविकाने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिलं, ''सचिवजी!'' हे ऐकून जितेंद्र कुमारही लाजल्याचं मुलाखतीत स्पष्ट दिसतं.

आणखी एका मुलाखतीत सानविका जितेंद्रचं तोंडभरून कौतुक करताना दिसतेय. ती म्हणाली की, ''माझा पहिल्या सीझनपासून ते आत्तापर्यंतचा प्रवास खरं तर खूप भारी आहे. कारण जितेंद्रसारखा सपोर्टिव्ह सहकलाकार मला मिळाला आहे. तो खूपच मदत करतो प्रत्येक गोष्टीत, समजून घेतो.'' त्यामुळे हे सगळं सोपं जात असल्याचं तिने सांगितलं. काही व्हायरल फोटोंवरूनही रिंकी आणि सचिवजी खऱ्या आयुष्यात डेट करत असल्याचं म्हटलं जातंय.

# अनधिकृत बांधकामांना शासन पाठीशी घालणार नाही : उपमुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतल्या अनधिकृत बांधकामांची यादी आणि त्यांचे वर्गीकरण करण्याचे निर्देश मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात येतील. शासन कोणत्याही अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालणार नाही. जर अधिकारी अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालत असल्याचे आढळले, तर त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य पराग अळवणी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य सर्वश्री योगेश सागर, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे पाटील, वरुण सरदेसाई, मुरजी पटेल, अजय चौधरी, बाळा नर यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, वसई-विरार महापालिकेच्या हद्दीतील अनेक अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून काही प्रकरणांमध्ये न्यायालयीन स्थगिती असल्यामुळे ती बांधकाम तात्पुरती शिल्लक राहिली आहेत. मात्र, न्यायालयाचे आदेश मिळताच तीही हटवली जातील.

सध्या पावसाळ्यामुळे काही ठिकाणी लोक वास्तव्यास असल्याने अनधिकृत बांधकामांवर त्वरित कारवाई करणे शक्य नाही. मात्र पावसाळ्यानंतर ती बांधकामेही निष्कासित केली जातील, असेही उपमुख्यमंत्री श्री शिंदे यांनी सांगितले.

विलेपार्ले (पूर्व) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंड क्र. २५६ वर अनधिकृतरित्या शेड बांधण्यात आल्याचे निर्दर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेकडून दिनांक २४ मार्च २०२५ रोजी या शेडवर तोडफोडीची कारवाई करण्यात आली.



त्यानंतर, संबंधित भूखंडावर अनधिकृत पार्किंगचे अतिक्रमण झाल्याची तक्रार महापालिकेकडे प्राप्त झाली. या तक्रारीची दखल घेत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३ जून २०२५ रोजी त्या अतिक्रमणावर कारवाई करून अनधिकृत पार्किंग हटवले असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, अनधिकृत बांधकामांवर एमआरटीपी कायद्यानुसार कारवाई केली जाते. सदस्यांनी त्यांच्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती द्यावी. संबंधित ठिकाणी कारवाई करण्यात येईल. अनधिकृत बांधकामाबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नॉर्थ कॅनरा गौड स्वारस्वत को - ऑप बँकेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी एसीबी मार्फत चौकशी : गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नॉर्थ कॅनरा गौड स्वारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापकीय संचालक, कर्मचारी आणि यु.बी. इंजिनिअरींगचे मुख्य वित्तीय अधिकारी व इतर संबंधित यांनी आपसात संगनमत करून सन २०१८ ते २०२१ यादरम्यान बँकेच्या गिरगाव शाखेतील यु.बी. इंजिनिअरींग कंपनीचे असयायक यांनी बंद केलेले बँक खाते मुख्य वित्तीय अधिकारी यांच्या बनावट पत्राच्या आधारे उघडून व सिग्रेटरी अर्थोरिटीमध्ये बदल करून त्यात आर्थिक व्यवहार केले. याबाबत १.८३ कोटी रुपये इतरत्र वळविली असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या असून या प्रकरणाचा तपास करणारा पोलीस अधिकारी यांचेही बँकेसोबत संबंध असल्याची तक्रार असल्याने या संपूर्ण प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी केली जाईल, अशी माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत दिली.यासंदर्भात सदस्य प्रसाद लाड, प्रवीण दरेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली, त्यावेळी गृह राज्यमंत्री कदम यांनी माहिती दिली.

या बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणावर विधान परिषदेत स्पष्टीकरण देताना राज्यमंत्री श्री.कदम यांनी स्पष्ट केले की, संबंधित वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्याविरुद्ध कुठल्याही आर्थिक देवाण-घेवाणीचा लेखी पुरावा चौकशी दरम्यान मिळालेला नाही. तथापि या प्रकरणी दाखल झालेल्या तक्रारीची त्यावेळचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांनी चौकशीस योग्य दिशा दिली नाही. म्हणूनच त्यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याबद्दल प्रशासनाने आवश्यक ती कारवाई केली आहे.बँकेसंदर्भात अधिकची माहिती देताना राज्यमंत्री श्री.कदम म्हणाले की, बँकेचे फ्रीज झालेले १.८३ कोटी रुपये अनधिकृतपणे डी-फ्रीज करून काढण्यात आले. त्यानंतर रिझर्व्ह बँकेच्या ऑडिटमध्ये ही बाब उघड झाल्यानंतर बँकेने संपूर्ण रक्कम व्याजासहित परत केली.



याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने संबंधित बँकेवर ५० लाख रुपयांचा दंड ठोठावला. या बँकेचे तत्कालीन महाव्यवस्थापक आणि त्यांची पत्नी (बँकेच्या चेअरमन) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या आधारे ४७ प्रकरणांत फॉरेन्सिक ऑडिट करण्यात आले असून चौकशी सध्या सुरू आहे.

## संक्षिप्त...

### प्रवीण गायकवाडांवरील हल्ल्यात भाजपने पोसलेलेच डावे, या लोकांवर जनसुरक्षा कायदा लावणार का? संजय राऊतांचा सवाल

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे रविवारी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर काळी शाई फेकून धक्कादायक हल्ला करण्यात आला. फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाज आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते आले असताना, काही लोकांनी त्यांच्या गाडीसमोर आक्रमकपणे येऊन काळी शाई फ केली आणि त्यांना खाली ओढून मारहाण केली. या हल्ल्यामागे भाजपशी संबंधित 'शिवधर्म फाउंडेशन'च्या कार्यकर्त्यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दीपक काटे (भाजप युवा मोर्चा – राज्य सचिव), किरण साळुंखे, भवानेश्वर शिरगिरे यांच्यासह एकूण सात जणांविरोधात अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी यापैकी दोन आरोपींना अटक केली असून पाच आरोपी सध्या फरार आहेत. या प्रकरणावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केलाय.

संजय राऊत म्हणाले की, भाजपचा संबंध आहे. ते जे आरोपी आहेत सगळे ते भाजप नेत्यांच्या आसपास असल्याचे व्हिडिओ आणि फोटो आले आहेत. म हाराष्ट्रामध्ये तुम्ही डाव्या विचारसरणीवरती दोष देत आहात. डावी विचारसरणी अमुक आणि तमुक. मग काल प्रवीण गायकवाड यांच्यावरती हल्ला झाला, ज्या पद्धतीने हल्ला झाला हे भारतीय जनता पक्षाने पोसलेलेच डावे होते. आता या लोकांवर जनसुरक्षा कायदा लावणार आहात का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

संजय राऊत पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात कुठेही कोणीही कोणाला मारत आहे. सामाजिक कार्यकर्त्याला, राजकीय कार्यकर्त्याला बाहेर फिरायला भीती वाटते. या भाजपच्या गुंड टोळ्या कधी कोणावर हल्ला करतील, याचा भरोसा नाही. महाराष्ट्राचं गुंड राष्ट्र फडणवीस यांच्या राज्यात करून टाकला आहे. जसं आमच्यासारख्या राजकीय कार्यकर्त्यांवर पीएम एलए कायद्याअंतर्गत खोटे गुन्हे दाखल केले, बनावट पद्धतीने संबंध जोडले गेले. तोच जन सुरक्षा कायदा आहे. तुमच्या सरकारमध्ये एवढी हिंमत आहे आणि तुम्ही एवढे पोलीस पोसलेले आहात. खाकी वर्दीतले अतिरेकी तुम्ही पोसलेले आहेत. खाकी वर्दीतले नक्षलवादी तुमच्याकडे आहेत. ते कोणाचाही संबंध कोणाशी जोडतील. देवेंद्र फडणवीस यांनी राज्य कसं करावं आणि कसं केलं जातं हे जेवढं त्यांना त्यांना माहिती आहे, तेवढं माझ्यासारख्या माणसाला सत्ता न भोगताही हे कसे एक असं राज्य करत आहेत हे मी सांगू शकतो, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला.

### इंदापूरचा रहिवाशी, ६ महिन्याआधी पिस्तुल अन् २८ काडतुसांसह पुणे विमानतळावर अटक

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर काल (१३ जुलै) अक्कलकोटम ध्ये शाईफेक करण्यात आली. प्रवीण गायकवाड हे अक्कलकोटे येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले असताना ही घटना घडली. प्रवीण गायकवाड यांनी आपल्या संघटनेच्या नावामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याने शाईफेक करण्यात आली. सदर प्रकरणी भाजप कार्यकर्ता दीपक काटे याच्यासह सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. अंगावर शाई-वंगण टाकणे, धक्काबुक्की करणे, हाताने मारहाण करणे तसेच गाडीला दगड मारून नुकसान करणे असे फिर्यादीत नम द केले आहेत. अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपक काटे हा इंदापूरचा रहिवासी आहे. भारतीय जनता पार्टीच्या अत्यंत जवळचा चंद्रशेखर बावनकुळे यांचा देखील कार्यकर्ता म्हणून त्याला ओळखलं जातं. भारतीय जनता युवा मोर्चाचा सचिव असलेल्या दीपक काटे याला सहा जानेवारी २०२५ ला पुणे विमानतळावर अटक करण्यात आली. दीपक काटे पुण्याहून हैद्राबादला विमानाने जाण्यासाठी पुणे विमानतळावर आला होता. विमानतळावरील सुरक्षा तपासणी दरम्यान यंत्रणेला त्याच्या बॅगमधे एक पिस्तुल आणि २८ काडतुसं आढळून आली. विमानतळावरील सुरक्षा यंत्रणेने दीपक काटेला पोलीसांच्या हवाली केले आणि त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. दीपक काटेचे चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर भाजप नेत्यांसोबत अनेक फोटो आढळून येतात.चार वर्षापूर्वी दीपक काटेने संभाजी बिडी नाव बदलण्यासाठी पुरंदर किल्ल्यावर आमरण उपोषण छेडले होते. त्यानंतर संभाजी बिडीचे नाव 'साबळे बिडी' असे करण्यात त्याला यश आले. आता संभाजी ब्रिगेड हे छत्रपती संभाजी महाराजांचे एकरी नाव होत आहे. त्यामुळे संभाजी ब्रिगेड नाव बदलावं अशी मागणी दीपक काटे यांची आहे.

# अवैध गुटखा व वाहनांसह १५ लाख ७६ हजाराचा मुद्देमाल जप्त

## वाशीम स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** अवैध गुटखा विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या वाहनावर कारवाई करून ६ लाख ७६ हजार ४६० रुपये व ९ लाख रुपये किंमतीचे वाहन असा एकूण १५ लाख ७६ हजार ४६० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.सदर कारवाई वाशिम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १४ एप्रिल रोजी अकोला वाशिम मार्गावरील मेडशी येथे केली. प्राप्त माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांना गोपणीय माहिती मिळाली की, अकोला येथून वाशीमकडे एका वाहनामध्ये अवैध गुटख्याची वाहतूक होत आहे.सदर माहितीवरून वाशीम व अकोला जिल्ह्याच्या हद्दीवर स्थानिक गुन्हे शाखेची टिम तात्काळ रवाना केली. टिमला दिलेल्या सुचनेप्रमाणे पेट्रोलींग करीत असतांना संशयीत वाहन आढळून आल्याने अकोला ते वाशीम रोडवरील मेडशी टी पॉईंटवरील जयभोले धाब्यासमोर सदर वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता, वाहनामध्ये पान मसाला, सुगंधीत तंबाखू, मिळून आल्याने आरोपी अब्दुल सादीक अब्दुल रफीक वय २६ वर्ष, रा. एकता चौक, शिवणी अकोला याच्यासह वाहनामधील गुटखा पान मसाला व सुगंधीत तंबाखु असा ६ लाख ७६ हजार ४६० रुपयांचा अवैध गुटखा व ९ लाख रुपये किंमतीचे वाहन असा एकूण १५ लाख ७६ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल पुढील कारवाई करीता पोलीस स्टेशन मालेगाव यांचे ताब्यात दिला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक पदीप परदेशी, योगेश धोत्रे, विनोद सुर्वे, ज्ञानदेव म्हात्रे, अमोल इरतकर, गोपाल चौधरी, संतोष वाघ यांच्या पथकाने केली.

# बनावट खतांविरोधात राज्यांनी कठोर पावले उचलावीत

नवी दिल्ली : देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीबाबत वाढती चिंता व्यक्त करत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कठोर कारवाईचे निर्दे श दिले आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना गुणवत्तापूर्ण खते वेळेवर व योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, कृषी ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर ठेवण्यासाठी दर्जेदार खतांची वेळेवर उपलब्धता अत्यावश्यक आहे. त्यांनी बनावट खतांची विक्री, अनुदानावरील खतांचा काळाबाजार आणि जबरदस्तीने टॅगिंग करण्यासारख्या बेकायदा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की, खतांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही राज्यांची जबाबदारी असून, काळाबाजार, जादा किमतीत विक्री आणि अनुदानावरील खतांचे चुकीच्या पद्धतीने वितरण यावर कडक नजर ठेवावी. खतांच्या उत्पादन आणि विक्रीवर नियमित देखरेख ठेवून सॅम्पलिंग आणि चाचणी प्रक्रियेद्वारे निकृष्ट दर्जाच्या खतांवर नियंत्रण ठेवावे. पारंपरिक खतांसह नॅनो-खते किंवा जैव-उत्तेजकांचे जबरदस्तीने टॅगिंग थांबवून दोषींविरुद्ध परवाना रद्द करणे, गुन्हे नोंदविणे आणि कायदेशीर कारवाई करावी.

शेतकऱ्यांना या प्रकारांपासून वाचवण्यासाठी त्यांना जागरूक करणे आणि त्यांच्याकडून अभिप्राय घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. शेतकरी व शेतकरी गटांना देखरेख प्रक्रियेत सहभागी करून खऱ्या-खोट्या उत्पादनांची ओळख पटवण्याची यंत्रणा विकसित करावी, असेही केंद्रीय मंत्री श्री. चौहान यांनी म्हटले आहे.

केंद्रीय मंत्र्यांनी राज्य शासनाला आवाहन केले आहे की, वरील मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्यव्यापी मोहीम राबवून बनावट आणि निकृष्ट खतांचा संपूर्ण बंदोबस्त करावा. राज्य पातळीवर या प्रक्रियेवर नियमित देखरेख ठेवली गेल्यास हा शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय ठरू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### पाकिस्तानमध्ये राजकीय भूकंपाचे संकेत? लष्करप्रमुखांबद्दल 'हे' धक्कादायक दावे; थेट पंतप्रधानांनी दिले स्पष्टीकरण!

नवी दिल्ली: पाकिस्तानच्या राजकारणात एक नवीन वाद सुरू झाला आहे. लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर स्वत: राष्ट्रपती होऊ इच्छित असल्याने राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांच्यावर राजीनामा देण्यासाठी खूप दबाव असल्याचा दावा केला जात आहे. आता पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची याबाबत प्रतिक्रिया समोर आली आहे. शाहबाज शरीफ यांनी अशा अटकळांना फेटाळून लावत म्हटले आहे की फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी कधीही राष्ट्रपती होण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही किंवा त्यांनी अशी कोणतीही योजना आखलेली नाही. पाकिस्तानचे पंतप्रधान नेहमीच लष्करप्रमुखांचे कौतुक करणाऱ्या अशा विधानांसाठी ओळखले जातात. शाहबाज शरीफ यांनी कधीही कोणत्याही बाबतीत असीम मुनीर यांच्यावर टीका केलेली नाही. शाहबाज शरीफ यांचे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नकवी यांनी गुरुवारी एक्स वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की शाहबाज शरीफ, आसिफ अली झरदारी आणि असीम मुनीर यांच्याविरुद्ध चालवल्या जाणाऱ्या प्रचार मोहिमेमागे परदेशी शक्तींचा हात आहे.

# वेळीच करा हुमणी किडीचे व्यवस्थापन: कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्राचा शेतकऱ्यांना सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हातील चिखली, मोताळा, देऊळगाव राजा व बुलढाणा तालुक्यातील शेतांमध्ये नुकत्याच झालेल्या कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्राच्या संयुक्त सर्वेक्षणात सोयाबीन व हळद पिकांवर हुमणी किडीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. काही ठिकाणी हा प्रादुर्भाव लक्षणीय असून शेतकरी बांधवांनी वेळीच सामूहिक उपाययोजना करून नियंत्रणात आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रवीण पी. देशपांडे व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल एस. झापे यांनी हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना सुचविल्या आहे. ते याप्रमाणे : प्रभावी उपाययोजना: शक्य असल्यास पिकामध्ये आंतरमशागत करावी व आंतरमशागत करताना जमिनीत असलेल्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. पाण्याचा मोकाट पद्धतीने वापर करून अळ्या गुदमरून मरतात व जमिनीवर येतात, त्यामुळे अशा पद्धतीचा अवलंब करावा. शेतातील तणांचा बंदोबस्त करावा.

जैविक उपाय: मेटारायझीयम ॲनिसोप्ली या जैविक बुरशीचा ५० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पंपाच्या नोजलशिवाय पिकाच्या मुळाशी आळवणी करावी.

रासायनिक उपाय (लेबल क्लेम नसलेले): क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही ५० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पिकाच्या मुळाशी आळवणी करावी. (फिप्रोनील ४०% + इमिडाक्लोप्रीड ४०%) मिश्र कीटकनाशक ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.

लक्षणे : हुमणी कीड ही बहुभक्षी असून तिच्या प्रादुर्भावामुळे झाडांची पाने पिवळी पडतात, झाडे सुकतात. अशी झाडे उपटून तपासल्यास त्यांची मुळे कुरतडलेली आढळतात. अशा झाडांच्या मुळेजवळ २-३ इंच खोलीवर अळ्या आढळून येतात. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळल्यास वरील उपायांची अंमलबजावणी करावी.

# विदर्भातील अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे नुकसानग्रस्त नागरिकांना मदत पोहोचवण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु : मंत्री गिरीश महाजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये ८ व ९ जुलै २०२५ या कालावधीत झालेल्या पूरपरिस्थिती उद्भवली होती. शासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकाऱ्यांना संपूर्ण अधिकार प्रदान केले असून, नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीने मदत पोहोचवण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाट बंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी विधानपरिषदेत निवेदनाद्वारे सादर केली.

मंत्री महाजन म्हणाले की, नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे. ७ नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू, तर ४ जण जखमी तर १७ मोठी जनावरे व १० लहान जनावरांचा मृत्यू झाला. ४० घरे पूर्णतः ढासळली, तर १,९२७ घरांचे अंशतः नुकसान झाले. २०९ गोठ्यांचे नुकसान झाले. ७१५ नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले. २०,८५४ हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले असून बाधित शेतकरी संख्या २९,९२० आहे. पंचनामे करण्याचे काम सुरू असून, अहवाल अद्याप शासनाकडे सादर होणे बाकी आहे. घरांच्या पडझडीसाठी निधी जिल्हा पातळीवर वितरित करण्यात आला आहे. तसेच घरगुती भांडी,



कपडे, टपरीधारक व दुकानदार यांना मदतीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.अमरावती विभागामध्ये देखील ८ व ९ जुलै दरम्यान अतिवृष्टीमुळे हानी झाली असून १ व्यक्ती मृत, १ जखमी, ९ घरे पूर्णतः ढासळली, १८० घरांचे अंशतः नुकसान झाले. ४ जनावरे दगावली ३,४११ हेक्टरवरील शेतीचे नुकसान पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. राज्य शासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीने मदत पोहोचवण्यात आहे, असे मंत्री महाजन यांनी सांगितले.

## विविध वृत्त...

### बुलडाणा येथे आज पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा/प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा मंगळवार दि. १५ जुलै २०२५ रोजी स्किल पॅरामेडिकल कॉलेज, वानखेडे ले-आऊट, डॉ. मेहेत्रे हॉस्पिटल जवळ, बुलडाणा येथे सकाळी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचा जिल्ह्यातील युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

१५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. या वर्षीची थीम Youth empowerment through AI and digital skills आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलडाणा आणि गुरुवारला स्किल पॅरामेडिकल कॉलेज, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावाचे आयोजन करण्यात आले आहे. रोजगार मेळाव्यामध्ये विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होऊन थेट मुलाखती घेणार असून उमेदवारांची प्राथमिक निवड आणि प्रशिक्षणासाठी संधी दिली जाणार आहे.

मेळाव्यात सहभागी होण्यासाठी १० वी, १२ वी, आयटीआय तसेच पदवीधर पात्रता असलेले पुरुष व महिला उमेदवार आपली शैक्षणिक कागदपत्रे घेऊन स्वखर्चाने उपस्थित राहावेत. उमेदवार एकापेक्षा अधिक पदांसाठीही मुलाखत देऊ शकतात. यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा येथे अथवा दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२ वर संपर्क साधावा.

### एसटीने घडविले ९.७१ लाख भाविकांचे "विठ्ठल दर्शन"; ३५.८७ कोटी उत्पन्नाची नोंद - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आषाढी वारीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे लाखो भाविकांची यात्रा दरवर्षी सुरू असते. यंदा या यात्रेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) भाविकांच्या सेवेसाठी विशेष पुढाकार घेत ५ हजार २०० जादा बसेसची व्यवस्था केली. या माध्यमातून ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक प्रवाशांची सुरक्ति ने-आण करत त्यांना विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घडवून देण्यात आले, अशी ही माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

३ ते १० जुलै २०२५ दरम्यान या बसेसनी २१ हजार ४९९ फेऱ्या केल्या. या सेवेतून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न झाले असून, मागील वर्षाच्या तुलनेत यामध्ये ६ कोटी ९६ लाख रुपयांनी वाढ झाली आहे. २०२४ मध्ये २८ कोटी ९१ लक्ष रुपये उत्पन्न होते. ''हजारो भाविकांना सुखरूप दर्शन घडवण्यासाठी अथक मेहनत घेणारे एसटीचे चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक व अधिकारी हे खरोखरच अभिनंदनास पात्र आहेत, असे परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले.

एसटी कर्मचाऱ्यांसाठी मोफत भोजन व्यवस्था : वारी काळात पंढरपूर येथे कार्यरत हजारो एसटी कर्मचाऱ्यांच्या भोजनाची अडचण लक्षात घेता, ५, ६ आणि ७ जुलै रोजी परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्वतःच्या खर्चातून मोफत जेवण व चहा-नाश्त्याची सोय उपलब्ध करून दिली होती. याचा लाभ हजारो कर्मचाऱ्यांनी घेतला. या उपक्रमाबद्दल एसटी कर्मचाऱ्यांनी मंत्री सरनाईक यांचे आभार मानले. वारी सेवा हे केवळ वाहतूक व्यवस्थापन नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकीचे उदाहरण आहे, हे यंदाच्या यशस्वी आयोजनातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

### सलग चौथ्यांदा सोने महाग टेरिफचा दबाव सोन्यात कायम !

**मुंबई/प्रतिनिधी :** आजही सलग चौथ्यांदा सोन्यात मोठी वाढ झाली आहे. प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारातील दबावामुळे सोन्यासह कमोडिटी बाजारातही अस्थिरता कायम आहे. युएसने काल युरोपियन युनियनवर परवा उशीरा ३०% कर, मेक्सिकोवर ३०म कर, कॅनडावर ३५% कर लादल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारासह सप्लाय चेन यंत्रणेवर दबाव तीव्र झाला. परिणामी आज सोन्याच्या आंतरराष्ट्रीय दरात वाढ झाली आहे. 'गुडरिटर्न्स ' संकेतस्थळावरील माहितीनुसार, आज सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १७ रुपयांनी वाढ घेत दर ९९८८ रूपये प्रति ग्रॅम दर सुरू आहे. २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १५ रूपयांनी वाढ झाल्याने दर ९१५५ रूपये प्रति ग्रॅम दर सुरू आहे. १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १२ रूपयांनी वाढ झाल्याने प्रति ग्रॅम दर ७४९१ रूप यांवर पोहोचला आहे. याशिवाय संकेतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १७० रूपयांची वाढ झाल्याने सोन्याचे दर ९९८८० रूपयांवर गेली आहे. २२ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १५० रूपयांनी वाढ झाल्याने दर पातळी ९१५५० रूपयांवर पोहोचली. १८ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १२० रूपयांनी वाढ झाल्याने दर पातळी ७४९१० रूपयांवर पोहोचली आहे. आज आंतरराष्ट्रीय सोन्याच्या गोल्ड फ्युचर निर्देशांक यामध्ये सकाळी ०.२६% वाढ झाली आहे. युएस गोल्ड स्पॉट दरात ०.१०% वाढ झाल्याने स्पॉट दर ०.११% वाढ झाल्याने प्रति डॉलर सोन्याची किंमत ०.२१% वाढत ३३६२ औंसवर गेली आहे.

# क्यु आर कोड सहित संगणकीकृत विवाह नोंदणीसाठी युजर आय डी ची ग्रामीण रुग्णालयाकडून मागणी

## संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांना विवाह निबंधक म्हणून शासनाने अधिकार दिले आहेत. विवाह नोंदणी केल्यानंतर संबंधितांना विना क्यू आर कोड प्रमाणपत्र मॅन्युअली दिले जाते. परंतु हे प्रमाणपत्र आधार अपडेट संगणकीय प्रणाली स्वीकारत नाही. त्यामुळे शेकडो प्रमाणपत्र धारकांची पंचाइत झाली आहे. मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्यामुळे माजी आमदार संजय रायमुलकर यांनी याबाबत तातडीने संगणक प्रणालीत बदल करण्याची मागणी केली होती.मेहकर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक यांनी त्यासाठी यूजर आयडी आणि पासवर्ड ची मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली आहे.

विना क्यू आर कोड विवाह नोंदणी प्रमाणपत्रे ग्रामीण रुग्णालयातून देण्यात येतात. प्रमाणपत्र धारक पत्नीच्या नाव बदलासाठी आधार अपडेट करण्यास सेतू अथवा आधार केंद्रात जातात. परंतु आधार अपडेट ची संगणकीय प्रणाली विना बारकोड विवाह नोंदणी प्रमाणपत्र स्वीकारत नाही. या प्रकारामुळे शेकडो नागरिक हैराण झाले आहेत. त्यांनी या प्रकाराची माहिती माजी आमदार संजय रायमुलकर यांना देऊन याबाबत शासन पातळीवर तजवीज करण्याची मागणी केली होती. रायमुलकर यांनी ग्रामीण रुग्णालयाकडे पाठपुरावा केला असता त्यांनी त्यांच्या अडचणी सांगितल्या. ग्रामीण रुग्णालयाकडेही मोठ्या प्रमाणात तक्रारी आलेल्या आहेत, असेही सांगण्यात आले.

यापूर्वी ग्रामीण रुग्णालयाने ही बाब वरिष्ठांकडे कळविली असता उपसंचालक आरोग्य सेवा तथा निबंधक विवाह मंडळ नोंदणी विभागस्तरीय समन्वय पुणे यांचे २७ सप्टेंबर २०२४ चे पत्र क्रमांक ९३३६ ज्यात म्हटले आहे की, आधार अपडेट साठी क्यू आर कोडचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु प्रत्यक्षात विना बारकोड विवाह नोंदणी प्रमाणपत्र सेतू किंवा आधार केंद्रात संगणक प्रणाली स्वीकारत नाही. त्यामुळे आधार अपडेट होत नाही. या प्रकारामुळे शेकडो प्रमाणपत्र धारक हैराण झाले आहेत. त्यांनी ग्रामीण रुग्णालयाकडे क्यू आर कोड सह विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे.



केंद्र सरकारचे यु आय डी ए आय विभागाचे संचालक यांनी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात विवाह नोंदणी बाबतचे प्रमाणपत्र क्यू आर कोड पद्धतीने नोंदणी केलेले असेल तरच विवाह नोंदणी आधार अपडेट होईल ,असे म्हटले आहे. अखेरीस आज वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनीता हिवसे यांनी त्यांचे पत्र क्रमांक १२२५ दि .१४ जुलै २०२५ जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्ममृत्यू विवाह नोंदणी बुलढाणा यांना पाठविले असून त्यात वरील सर्व अडचणी नमूद करून विवाह नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाइन व बारकोड पद्धतीने संबंधितांना देण्यासाठी युजर आयडी आणि पासवर्ड ग्रामीण रुग्णालयाला देण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

### तलवारीने दहशत पसरविणाऱ्याला पोलिसांनी घेतले ताब्यात

**– मांडवा गावातील घटना**

**– विविध कलमान्वये गुन्ह्याची नोंद**

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**

**दिग्रस :** तालुक्यातील मांडवा येथील एका तरुणाने हातात तलवार घेऊन दहशत पसरवीत असतांना तलवारीसह रंगेहात पकडण्यात दिग्रस पोलिसांना यश आले असून आरोपीला तलवारीसह ताब्यात घेत विविध कलमान्वये गुन्ह्याची नोंद केल्याची घटना १३ जुलै २०२५ दुपारी ४.३० वाजताच्या दरम्यान घडली.



दीपेश शंकर धनगर (वय -२२) वर्ष रा. मांडवा असे तलवार घेऊन दहशत पसरविणाऱ्या आरोपीचे नाव आहे. तालुक्यातील मांडवा गावात आपल्या आई, वडील, भाऊ व भावजय यांना जिवाने मारण्याच्या उद्देशाने हातात तलवार घेऊन गावात फिरत होता. या घटनेची माहिती पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांना मिळताच पोलीस ताफा घटनास्थळी पोहचला. आरोपीला तलवारीसह ताब्यात घेत त्यांच्यावर भादवी कलम ४/२५ आर्म ऍक्ट नुसार गुन्ह्याची नोंद केली. ही कारवाई ठाणेदार वैजनाथ मुंडे, नंदू घुगे व लक्ष्मण जाधव यांनी केली.

### जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतील प्रारूप प्रभाग रचनेबाबत हरकती,सुचना मागवल्या

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ४५) च्या कलम ९२ पोट-कलम (१) अन्वये वाशिम जिल्ह्यातील आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या जिल्हा परिषद क्षेत्रांतील निवडणूक विभागांची व कलम ५८ (१) (अ) अन्वये पंचायत समित्यांमधील निवडणूक गणांच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी जिल्हाधिकारी, वाशीम यांच्या क्रमांक २०२५/ जि.प.नि./कावी- ४१९ दिनांक १४/०७/२०२५ च्या आदेशानुसार अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या अधिसूचनेद्वारे प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत.

याबाबतची माहिती जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी दिली आहे. अधिसूचनेनुसार, प्रारूप प्रभाग रचना पुढील ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे:

(१) जिल्हाधिकारी, वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर.
(२) जिल्हा परिषद, वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर.
(३) तहसीलदार, कारंजा, मानोरा, मंगरुळपीर, मालेगाव, रिसोड व वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर.
(४) पंचायत समिती, कारंजा, मानोरा, मंगरुळपीर, मालेगाव, रिसोड व वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर.

या आदेशाच्या मसुद्यावर कुणाचीही हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सविस्तर लेखी निवेदने किंवा हरकती जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे दिनांक २१ जुलै पर्यंत सादर कराव्यात. उपरोक्त तारखेनंतर जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे आलेली कोणतीही निवेदने, हरकती किंवा सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.नागरिकांनी या प्रारूप प्रभाग रचनेचे अवलोकन करून, आवश्यकतेनुसार आपल्या हरकती किंवा सूचना वेळेत सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र विकास व्हिजन २०२४ मध्ये वाशिमकरांची भूमिका महत्त्वाची

**■ नागरिकांना अभिप्राय नोंदवण्याचे आवाहन**

**■ १७ जुलैपर्यंत होणार सर्वेक्षण**

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने विकसित महाराष्ट्र २०२४: महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाकांक्षी नागरिक सर्वेक्षण हाती घेतले आहे. या सर्वेक्षणात वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन आपल्या कल्पना व सूचना मांडाव्यात, असे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. राज्याच्या भविष्यातील विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी नागरिकांचा थेट सहभाग मिळावा हा यामागे मुख्य उद्देश आहे.

या सर्वेक्षणाअंतर्गत नागरिकांना एका विशिष्ट लिंकद्वारे किंवा क्यूआर कोड स्कॅन करून आपले मत नोंदवता येणार आहे. सर्वेक्षणात एकूण सात प्रश्न असून, त्यापैकी पहिले सहा प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचे आहेत. सर्वात महत्त्वाचा सातवा प्रश्न हा नागरिकांना २०४७ मध्ये विकसित महाराष्ट्र आपल्या मते कसा राहील याविषयी सविस्तर अभिप्राय नोंदवण्यासाठी आहे.महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या माहितीनुसार, या सर्वेक्षणात येत्या १८ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांना यामध्ये आपला सहभाग नोंदवता येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या विकसित महाराष्ट्र अभियानात नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि डॉ. आरिफ उस्वाल यांसारख्या प्रमुख नेत्यांनीही या अभियानात नागरिकांच्या सक्रिय सहभागासाठी आवाहन केले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन, जिल्ह्याच्या तसेच राज्याच्या विकासासाठी आपल्या सूचना व कल्पना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन नियोजन विभागातर्फे करण्यात आले आहे. आपला अभिप्राय महाराष्ट्राच्या भावी विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी दिशादर्शक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### आंबे भरलेला ट्रक उलटून ९ कामगार ठार: तब्बल तीस ते चाळीस टन आंब्याखाली दबल्याने गेला नागरिकांचा बळी

**अमरावती/प्रतिनिधी :** आंबे भरुन जाणारा ट्रक उलटून झालेल्या भीषण अपघातात तब्बल ९ कामगारांचा मृत्यू झाला. ही घटना आंध्रप्रदेशातील रेड्डीपल्ली चेरुवू इथं घडली. या घटनेत इतर दहा कामगार जखमी झाले आहेत. त्यांना राजमपेटा सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेत चित्तेम्मा (२५), सुब्बरथन्म्मा (४५), गज्जला दुर्गय्या (३२), गज्जला श्रीनू (३३), गज्जला लक्ष्मी देवी (३६), राधा (३९), गज्जला रमणा (४२), व्यंकट सुब्बम्मा (३७) यांचा जागीच मृत्यू झाला. मुनिचंद्र (३८) यांना राजमपेट रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केलं.

चालकाचा ट्रकवरील ताबा सुटल्यानं घडला भीषण अपघात : अन्नमैया जिल्ह्यातील पुल्लमपेटा मंडळ परिसरात हा अपघात झाला. राजमपेटाहून रेल्वे कोडूर इथं आंबे भरून जाताना पुल्लमपेटा मंडळातील रेड्डीपल्ली चेरुवू इथं चालकाचा ट्रकवरील ताबा सुटल्यानं तो उलटला. या अपघातात ९ कामगारांचा मृत्यू झाला तर इतर १० कामगार गंभीर जखमी झाले. त्यांना राजमपेटा सरकारी रुग्णालयात नेण्यात आलं असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

### अन्यथा आंदोलन अजून तीव्र करणार : बच्चू कडू , 'सातबारा कोरा' यात्रेचा समारोप

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी ::** शेतकर्यांच्या हक्कांसाठी लढा देणारे प्रहार संघटनेचे संस्थापक माजी राज्यमंत्री बच्चु कडू यांच्या 'सातबारा कोरा यात्रा' चा समारोप अंबोडा(ता,महागाव) येथे सोमवारी (दि,१४) जनसामान्यांच्या प्रचंड सहभागाने पार पडला. या समारोपप्रसंगी बच्चू कडूंनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, सातबारा कोरा न झाल्यास शासनाला स्वस्थ बसू देणार नाही. त्यांनी शासनाला इशारा दिला की जर लवकरच निर्णय घेतला गेला नाही, तर 'सातबारा आंदोलन' अधिक व्यापक आणि तीव्र स्वरूप घेईल.





सातबारा उताऱ्यावरून शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीचे स्वप्न साकार व्हावे यासाठी ही यात्रा काढण्यात आली होती. अकोला जिल्ह्यातील पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या पापळ गावातून ही यात्रा काढण्यात आली. १३८ किमी पायी मार्गक्रमण करत, देशातील पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झालेल्या महागाव तालुक्यातील गव्हाण या साहेबराव करपे या शेतकऱ्याच्या गावात या यात्रेचा समारोप करण्यात आला. या यात्रेदरम्यान बच्चु कडूंनी शेकडो शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्या, शासनाचे दुर्लक्ष समोर आणले आणि जनजागृती केली.

हा समारोप कार्यक्रम यवतमाळ जिल्ह्यात अंबोडा येथे पार पडला. यावेळी हजारो कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक उपस्थित होते. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, विजेची सवलत, आणि शेतमालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी संघर्ष अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत या समारोपावेळी देण्यात आले.

या समारोप सोहळ्याच्या माध्यमातून राज्यातील शेतकरी प्रश्न्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले असून, या आंदोलनाच्या पुढील टप्प्याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या यात्रेच्या समारोपीय सभेत, आमदार रोहित आर पाटील, माजी आमदार राजेंद्र नगरधने, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्ष वर्षा निकम ,काँग्रेसच्या राजीव गांधी पंचायत राज सेलचे राज्य समन्वयक साहेबराव कांबळे आदिसह, सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.